**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आचारसंहिता- एकत्रित आदेश-मतदान प्रतिनिधींची नेमणूक**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

**क्रमांक-स्थास्वसं-२००४/प्र.क्र.२५/कार्या-०५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबईः- ४०० ०३२.**
**दिनांक- १०नोव्हेंबर, २००४.**

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश दिनांक- २९ मार्च, २००४ रोजी निर्गमित केले. या आदेशामध्ये परिच्छेद क्रमांक-(१६) मधील च(अ)छ सर्वसाधारण वर्तणूक या मथळयाखालील उप परिच्छेद-१० दाखल करुन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नेमण्यात येणा-या मतदान प्रतिनिधींबाबतच्या तरतुदींची आचारसंहितेच्या एकत्रित आदेशामध्ये समावेश करावा, अशा निर्णयाप्रत राज्य निवडणूक आयोग आले आहे.

**१०. मतदान प्रतिनिधींची नेमणूक :-** मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्त करावयाची व्यक्ती संबंधित प्रभागातील राहणारी असावी व तिला मतदार ओळखता यावेत. ज्या उमेदवारांना मतदान प्रतिनिधी नेमावयाचा आहे त्यांनी मतदान प्रतिनिधी किंवा त्याचा परिहारक प्रतिनिधी यांची नांवे व पत्ते निवडणुकीच्या दिनांकापूर्वी एक दिवस आधी निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवावेत. ज्या व्यक्तींविरुध्द गुन्हेगारीची नोंद असेल किंवा निवडणूकविषयी गैरव्यवहारात समाविष्ट असल्याची पूर्वीची नोंद असेल किंवा त्यांच्या वर्तणुकीमुळे मतदारांमध्ये दहशत पसरु शकेल, अशा व्यक्तींना मतदान प्रतिनिधी म्हणून नेमण्यात येऊ नये.

**( नंद लाल )**
**राज्य निवडणूक आयुक्त,**
**महाराष्ट्र**

प्रति,
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव/सर्व विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व प्रादेशिक संचालक व विभागीय आयुक्त, नगरपालिका प्रशासन
सर्व महानगरपालिका आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मुख्य/अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/नगर पंचायती
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
निवड नस्ती